N A Ordres

वाचले- १)श्री रमेश बद्रीप्रसाद अगरवाल व इतर नर्फे कुलमुखत्यारधाकर मे साई श्रध्दा असो. तर्फे भागीदार श्री विजय पांडुरंग जगताप व इतर १ रा. पिंपळेगुरव पुणे यांचा दिनांक २४.६.२०१० रोजीचा अर्ज
२)पुणे महानगरपालीका यांचेकडील जा.क्र.सीसी/००७९/२००८ दि.८.४.२००८
३)मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परीपत्रक क्र.मह/२/जमिन/जनरल/ आरआर/७७२/२००३ दि.२२.९.२००३

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र.पमह/एनअे/एसआर/५५०/२०१०
पुणे दिनांक १९/०९/२०१०

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

विषय- अकृषिक परवानगी
मौजे बालेवाडी ता. हवेली येथील स नं २८/३ब/१ पैकी ३६२१ चौ.मी क्षेत्रास निवासी प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी मिळणेबाबत.

आदेश-

मौजे बालेवाडी ता. हवेली जि. पुणे येथील सर्व्हे नंबर २८/३ब/१ मधील क्षेत्र खालीलप्रमाणे हक्कनोंदणीस दाखल आहे.

| मूळ जमिन मालकाचे नाव | स.नं/ग. नंबर | क्षेत्र (चौ.मी) ७/१२ नुसार | क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|
| रमेश बद्रीप्रसाद अग्रवाल | २८/३ब/१पै | ५००.०० | ५००.०० |
| बनवारीलाल रामनिरंजन बजाज | २८/३ब/१पै | ६४७.०० | ६४७..०० |
| शोभा विमल बजाज | २८/३ब/१पै | ५००.०० | ५००:०० |
| सौ शांता रमेश आगरवाल | २८/३ब/१पै | ५००.०० | ५००.०० |
| राधीका परशुराम आगरवाल | २८/३ब/१पै | ५०५.०० | ५०५.०० |
| साधना परशुराम आगरवाल | २८/३ब/१पै | ५००.०० | ५००.०० |
| १ सुजाता शंकर खळे<br>२ संजय अनंता खळे<br>३ शोभना अनंत खळे | २८/३ब/१पै | ३१०३४.०० | ४६९.०० |
| एकूण क्षेत्र | | ३४१८६.०० | ३६२१.०० |
| अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | ३६२१.०० चौ.मी |
| (-)रस्त्याखालील व आरक्षीत क्षेत्र आर पी रोड | | | ००.०० चौ.मी |
| बिनशेती करावयाचे निव्वळ क्षेत्र | | | ३६२१.०० चौ.मी |

प्रश्नाधिन जमिन वरील मूळ मालक यांनी खरेदीखताने घेतलेली असून फेरफार नंबर ३१४२ ते ३१४७ व ५६५४ अन्वये अधिकार अभिलेखात नोंद झालेली आहे.

१)प्रश्नाधिन जमिन भोगवटादार वर्ग १ ची असून ती अर्जदार यांच्या मालकीची आहे.
२)जमिन पाटील वतनाची नाही.
३)जमिन कूळकायद्यातील नाही.
४)रस्त्यासाठी क्षेत्र संपादन झालेले नाही.
५)विषयांकीत जमिन ही वनसंवर्गातील नाही.

अर्जदार यांनी मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परीपत्रक क्र.मह/२/जमिन/जनरल/आरआर/७७२/२००३ दि.२२.९.२००३ अन्वये दिलेले निर्देश व त्यासोबत निहीत केल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र व क्षतीपत्र दिनांक २४.६.२०१० रोजी पब्लीक नोटरी यांचेसमोर करून दाखल केलेले असून त्यात नमूद केलेले आहे की सदर जमिन संपादनाखाली संपादीत झालेली नसून संपादानासाठी प्रस्तावित नाही. सदर जमिनीस पोहंच रस्ता आहे. तसेच सदर जमिन कूळकायद्यातील अधिनियम १९४८, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६, शेतजमिन धारणा कमाल मर्यादा अधिनियम १९७६, इनाम व वतन कायदा १९७५, पुनर्वसन कायदा १९७५ व १९८३,अनूसचित जमातींचे जमिनीबाबत कायदा तसेच नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ चा कायदा सर्व कायद्याचे तरतूदीचे भंग झालेला नाही. अर्जदार यांनी विहीत नमुन्यातील यूएलसी बाबत शपथपत्र व बंधन रूपये ३०० च्या स्टॅम्पवर पब्लीक नोटरी यांचेसमोर करून सादर केलेले आहे. तसेच सदरचे क्षेत्र व जमिन नवीन शर्त वर्ग २ पैकी नाही.

अर्जदार यांनी सादर केलेले बांधकाम/रेखांकन आराखडे पुणे महानगरपालीका यांनी छाननी करून त्यांनी त्यांचेकडील क्र.सीसी/००७९/२००८ दि:८.०४.२००८ अन्वये अर्जदार यांना बांधकाम चालू करण्याबाबत दाखला मंजूर केलेले आहे.

तहसिलदार हवेली जि.पुणे यांनी स्थळपहाणी करून अहवाल क्र.बिनशेती/कावी/१८७०/२०१० दि.२९.०६.२०१० अन्वये सादर केलेला आहे. सदर ठिकाणी अर्जदार यांनी परवानगी पुर्व बांधकाम सुरू केलेले असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामूळे अर्जदार यांचेकडून अकृषिक दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत अकृषिक प्रयोजनापुर्वी निवासी प्रयोजनाकरीता अर्जदार यांनी प्रती चौ.मी.ला. रूपये ०.९४८ पै प्रमाणे ३६२१ चौ.मी क्षेत्रावर अकृषिक सारा रूपये ३४३३/-रूपये, त्यावरील रूपांतरीत कर रूपये १७१६४/-, अनधिकृत अकृषिक १,३७,३२०/--असे एकूण १,५७,९१७/-रूपये शासकीय खजिन्यात चलनाद्वारे दिनांक ९.९.२०१० रोजी तर मोजणी फी रक्कम रूपये १५०००/-दिनांक १३.९.२०१० रोजी शासकीय खजिन्यात जमा करून प्रत या कार्यालयास सादर केलेली आहे.

| अक्र | बांधकाम नकाशा क्र. | बांधकाम नकशाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | १/१ | बिल्डींग लेआऊट प्लॅन, लोकेशन प्लॅन एरीया की प्लॅन |

सबब महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व त्याखालील नियमानुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ नूसार जिल्हाधिकारी पुणे यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनूसार श्री रमेश बद्रीप्रसाद अग्रवाल व इतर तर्फे कुलमुखत्यारधाकर मे साई श्रध्दा असो. तर्फे भागीदार श्री विजय पांडुरंग जगताप व इतर १ यांना मौजे बालेवाडी ता.हवेली येथील सर्व्हे नंबर २८/३ब/१ मधील ३६२१ चौ.मी. यास पुणे महानगरपालीका यांनी मंजूर केलेल्या बांधकाम आराखडयाच्या अटी व खालील नमूद अटी व शर्ती बंधनकारक करण्यात येवून निवासी प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी देण्यात येत आहे.

## अटी व शर्ती

१ सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियमान्वये देण्यात येत आहे.

२ अर्जदार यांनी जमिनीचा वापर त्यावरील इमारतीसह ज्या काराणासाठी दिला आहे त्याच कारणासाठी करावा.

३. जमिनीचा अकृषिक वापर या आदेशाचे दिनांकापासून सुरू झाला असे समजण्यात येईल.

४ अर्जदार यांनी इमारतीचे बांधकाम पुणे महानगरपालीका यांनी त्यांचेकडील क्र.सीसी/००७९/२००८ दि:०८.४.२००८ अन्वये मंजूर केलेल्या रेखांकन/इमारत नकाशाप्रमाणे केले पाहीजे व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरबदल सक्षम प्राधिका-याच्या परवानीशिवाय करू नये.

५ अर्जदार यांनी प्रतिवर्षी नव्याने निवासी प्रयोजनासाठी प्रती चौ.मी ०.९४८ रू प्रमाणे अकृषिक सारा रूपये ३४३३/--व त्यावरील रूपांतरीत कर रूपये १७१६४/-व त्यावरील उपकर ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे, त्यासाठी शासनास भरावा. सदर आकारणी ही तातुरत्या स्वरूपाची असून दिनांक

१.८.२००६ ते ३१.७.२०११ या कालावधीसाठी अकृषिक प्रमाणदर अंमलात आल्यानंतर फरकाची रक्कम असल्यास ती शासनास जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकार राहील.

६ सदरची अकृषिक परवानगी नागरी जमिन कमाल धारणा कायदा १९७६ मुंबई शेतजमिन व कुळकायदा अधिनियम १९४८,महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा, महानगरपालिका कायद्याचे तरतुदीस पात्र राहून देण्यात आली आहे.

७ सदरच्या आदेशातील अकृषिक क्षेत्र व अकृषिक सारा यामध्ये नगर भूमापन अधिकारी, पुणे यांचेकडून प्रत्यक्ष मोजणी नंतर जो फेरबदल होईल तो करण्यास पात्र राहील.

८ अर्जदार यांनी महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी )नियम १९६९ चे परीशिष्ट ४ व ५मधील अटी व शर्तीचा उल्लेख करून सनद करून घ्यावी.

९ सदर आदेशामधील अटी व शर्तीचा भंग केल्यास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियमानुसार दंडास पात्र राहील तसेच दिलेली अकृषिक परवानगी रद्द समजण्यात येईल.

१० याप्रकरणी प्रस्तावित क्षेत्रावर अकृषिक परवानगीपूर्वी अकृषिक वापर सुरु केलेने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १४३ चे तरतुदीनुसार दंडणीय रक्कम पुणे म.न.पा. कडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

११. अर्जदार यांनी सादर केलेली माहीती, प्रतिज्ञापत्र व कागदपत्र सादर केलेल्या माहीतीच्या आधारे देण्यात आलेली असल्यामूळे प्रकरणातील कागदपत्र चुकीची दिशाभूल करणारी निदर्शनास आल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

(चंद्रकांत दळवी)
जिल्हाधिकारी, पुणे

प्रति- श्री रमेश बद्रीप्रसाद अग्रवाल व इतर तर्फे कुलमुखत्यारधारक
मे साई श्रध्दा असो. तर्फे भागीदार
श्री विजय पांडुरंग जगताप व इतर १
रा. पिंपळेगुरव पुणे